### उत्पादक कंपन्यांना वापरलेल्या नॅपकीनच्या पोत्यांची भेट

# कचरा वेचकांचे आरोग्य धोक्यात

**पुणे** | दि. ८ (प्रतिनिधी)

**घराघरांत** जाऊन कचरा गोळा करणाऱ्या महिलांना कचऱ्यामधून स्वतःच्या हाताने वापरलेले सॅनिटरी नॅपकीन वेगळे करावे लागत आहेत. यामध्ये दुखावणारा आत्मसन्मान आणि नॅपकीन हाताळावे लागत असल्याने आरोग्याविषयी निर्माण झालेला प्रश्न यामुळे कचरा वेचक महिला त्रस्त झाल्या आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांनी सॅनिटरी नॅपकीनने भरलेली पोती उत्पादक कंपन्यांना पाठवून याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा उभारावी, अशी मागणी केली आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये महिन्याला ४ ते ५ लाख सॅनिटरी नॅपकीन वापरले जाऊन कचऱ्यामध्ये फेकले जातात. परंतु त्यांना योग्य पद्धतीने कागदामध्ये गुंडाळले जात नसल्याने कचरा वेचणाऱ्या महिलांना ते हाताने उचलावे लागत आहेत. याबाबत दोन्ही महानगरपालिका आणि उत्पादक कंपन्यांशी अनेकदा चर्चा आणि पत्रव्यवहार करूनही कोणतेही ठोस निर्णय घेतले गेले नाहीत, अशी माहिती 'स्वच्छ' संस्थेच्या मालती गाडगीळ यांनी दिली. सॅनिटरी नॅपकीन गोळा करण्याचा आणि विल्हेवाटीच्या वाढणाऱ्या प्रश्नाबाबत व्यथा मांडण्याकरिता 'स्वच्छ' आणि कागद, काच, कचरा वेचक संघटनेच्या महिला एकत्र आल्या. स्वच्छ संस्थेच्या मंगल कांबळे, बेबी मोहिते, अनिला डहाके, लेखा सपकाळ, मृगा किर्लोस्कर आदी उपस्थित होत्या.

### चर्चा करण्याकरिता कंपन्यांच्या प्रतिनिधींची अनुपस्थिती

सामान्य नागरिक, संस्था आणि उत्पादक कंपन्या यांच्यात चर्चा करण्याकरिता पुणे महानगरपालिकेने ८ जानेवारी रोजी बैठक बोलाविली होती. परंतु त्यामध्ये कंपन्यांचे प्रतिनिधी न आल्याने व पत्रांना उत्तरे न दिल्याने हा प्रश्न गंभीर होत चालला आहे, असे गाडगीळ यांनी सांगितले.

### 'स्वच्छ' ने तयार केल्या कागदी पिशव्या

सॅनिटरी नॅपकीनची विल्हेवाट लावण्याकरिता 'स्वच्छ'ने कागदी पिशव्या तयार केल्या आहेत. नागरिकांनी त्या पिशव्या विकत घेऊन त्यामध्ये वापरलेले सॅनिटरी नॅपकीन टाकल्यास त्याचे वर्गीकरण करणे सोपे होणार आहे. तसेच यामुळे कचरा वेचक कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका टाळता येईल.

लोकमत Hello पुणे
शनिवार
दि. ९ मार्च २०१३